महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक
गट/सर्व्हे नं. १५६०/१ आडगांव शिवार, न्यु इंग्लिश स्कुल जवळ, मुंबई आग्रा रोड, नाशिक – ४२२ ००३

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education,
Nashik Divisional Board, Nashik
Gat/Sr.No .1560/1 Adgaon Shivar, New English School, Mumbai-Agra Road, Nashik – 422003

Website - sscboardnashik.com Email - nsksec@rediffmail.com कार्यालय दुरध्वनी : ०२५३–२९४५२४१, २९४५२५१

**अत्यंत महत्त्वाचे**
**कालमर्यादित**

क्र.नाविमं/लेखा/दुष्काळ ख. हं./3207
नाशिक – ४२२ ००३
दिनांक :– ०७/०२/२०२५

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
नाशिक, धुळे, जळगाव व नंदुरबार जिल्हे

विषय :– सन २०२३–२४ मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य भागातील इ.१०वी व इ.१२वी च्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करणेकरीता उर्वरीत विद्यार्थ्यांचे बँक खाते व अनुषंगिक माहिती सुधारित करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल दि.०३/०२/२०२५ ते दि.१४/०२/२०२५ या कालावधीत उपलब्ध असल्याबाबत...

संदर्भ :– १. शासन निर्णय क्र.एससीवाय–२०२३/प्र.क्र.३७/म–७, दि.३१/१०/२०२३ चे पत्र.
२. शासन निर्णय क्र.एससीवाय–२०२३/प्र.क्र.३७/म–७, दि.१०/११/२०२३ चे पत्र.
३. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी–५, दि.०१/०८/२०१९ व दि.०३/०२/२०२० चे शुध्दीपत्रक.
४. क्र.रा.मं/सन २०२३ दुष्काळ ख.हं./४३९, दि. ३१/०१/२०२५ चे पत्र.
५. या कार्यालयाचे क्र.नाविमं/लेखा/दुष्काळ ख.हं./३११७, दि.३१/०१/२०२५ चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दि.०१/०८/२०१९ व शुध्दीपत्रक दि.०३/०२/२०२० अनुसार सन २०२३–२४ मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य भागातील इ.१०वी व इ.१२वीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परतावा विद्यार्थी/पालकांच्या आधार संलग्न बँक खात्यात सन २०२३–२४ व सन २०२४–२५ या आर्थिक वर्षात एकूण ८ लॉटव्दारे राज्य मंडळ कार्यालयामार्फत एकूण ३,४०,१६५ विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क परतावा देण्यात आलेला आहे. नाशिक विभागीय मंडळांतर्गत येणारे नाशिक, धुळे, जळगाव व नंदुरबार या जिल्ह्यातील इ.१०वी चे ४३,०३९ व इ.१२वी चे २२,८५६ असे एकूण ६५,८९५ विद्यार्थ्यांचा परीक्षा शुल्क परतावा प्रलंबित आहे.

तथापि, ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क त्यांचे आधार संलग्न बँक खात्यात वर्ग झाले नाही अशा बँकेकडून Reject झालेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्काचा परतावा करण्याकरीता पात्र विद्यार्थ्यांचे आधार लिंक असलेले बँक खाते तपशील, विद्यार्थ्यांचे आधारकार्ड इ. माहितीमध्ये दुरुस्ती/सुधारित माहिती सादर करण्याकरीता इ.१०वी **http://feerefund.mh-ssc.ac.in** आणि इ.१२वी करीता **http://feerefund.mh-hsc.ac.in** या ऑनलाईन लिंकवर <u>दि.०३/०२/२०२५ ते दि.१४/०२/२०२५ या कालावधीत विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक तपशील व इतर माहिती दुरुस्त/सुधारित करण्याकरीता लिंक सुरु करण्यात येत आहे.</u>

तरी, यापुर्वी परीक्षा शुल्काचा परतावा न झालेल्या पात्र विद्यार्थ्यांचे आधारलिंक असलेल्या बँक खात्याचा अचूक तपशील व विद्यार्थ्यांचे आधारकार्ड इ. बाबतची दुरुस्ती/सुधारीत माहिती उपरोक्त कालावधीत इ.१०वी करीता **http://feerefund.mh-ssc.ac.in** आणि इ.१२वी करीता **http://feerefund.mh-hsc.ac.in** या ऑनलाईन लिंकवर भरण्याची कार्यवाही गांभीर्याने पूर्ण करावी.

तसेच परीक्षा शुल्काचा परतावा मिळणेस पात्र असलेला कोणताही विद्यार्थी सदर लाभापासून वंचित रहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी आणि परीक्षा शुल्क परतावा मिळणेस पात्र असलेला विद्यार्थी सदर लाभापासून वंचित राहिल्यास यास मुख्याध्यापक जबाबदार रहतील, याची नोंद घ्यावी.

(एम. एस. देमले)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक — ४२२ ००३